Maharashtra State Board of Secondary Higher Secondary Education S.R.No.83 A, Final Plot No. 178,179, Near Balchitrawani, Behind Agharkar Research Institute, Bhamburda, Shivajinagar, Pune-411004.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ स.न.८३२–ए, फा.प्लॉ.नं. १७८, १७९, बालचित्रवाणी शेजारी, आघारकर रिसर्च इन्स्टिटयूटच्या मागे, भांबुर्डा, शिवाजीनगर, पुणे ४११ ००४.

Tel : Chairman (P) : STD . (020)-25651751 Secretary(P) : 25651750 & EPABX -25705000 &
Email : secretary.stateboard@gmail.com

क्रमांक रा.मं./परीक्षा-८/१७६३
पुणे - ४११ ००४
दिनांक - २२/०५/२०२५

प्रति,

विभागीय सचिव,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च
माध्यमिक शिक्षण मंडळ,
सर्व विभागीय मंडळे,

विषय – उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) पुरवणी परीक्षा जून–जुलै २०२५ अतिविलंब/विशेष अतिविलंब/अतिविशेष अतिविलंब शुल्काने परीक्षेची आवेदनपत्रे भरण्याच्या तारखांबाबत.

उपरोक्त विषयास अनुसरून आपणास कळविण्यात येते की, जून–जुलै २०२५ मध्ये होणाऱ्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) पुरवणी परीक्षेस प्रविष्ट होणाऱ्या विद्यार्थ्यांची नियमित व विलंब शुल्कासह परीक्षेची आवेदनपत्रे ऑनलाईन स्विकारण्याची मुदत दि.२२/०५/२०२५ रोजी संपुष्टात येणार आहे.

आवेदनपत्र सादर करण्याची विलंब शुल्काची निर्धारीत मुदत संपल्यानंतर अतिविलंब/ विशेषअतिविलंब/ अतिविशेषअतिविलंब शुल्काने परीक्षेची आवेदनपत्र स्विकारण्याच्या तारखा व इतर तपशीलवार माहिती खालील प्रमाणे देण्यात येत आहे.

अतिविलंब शुल्क मुदत (रू.५०/– प्रतिदिनी,प्रतिविद्यार्थी प्रमाणे)	विशेष अतिविलंब शुल्क मुदत (रू.१००/–प्रतिदिनी,प्रतिविद्यार्थी प्रमाणे)	अतिविशेष अतिविलंब शुल्क मुदत (रू.२००/–प्रतिदिनी,प्रतिविद्यार्थी प्रमाणे)
शुक्रवार दि.२३/०५/२०२५ ते सोमवार दि.२/०६/२०२५	मंगळवार दि.०३/०६/२०२५ ते शुक्रवार दि.१३/०६/२०२५	शनिवार दि. १४/०६/२०२५ ते सोमवार दि. २३/०६/२०२५

१.सदर आवेदनपत्र उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयाने ऑनलाईन पद्धतीने (www.mahahsscboard.in) या संकेतस्थळावर भरावयाची आहेत. आवेदनपत्र online भरलेल्या विद्यार्थ्यांचे अतिविलंब/विशेष अतिविलंब/अतिविशेष अतिविलंब शुल्क online चलन तयार करून चलनावर नमुद ICICI बॅंकेच्या Virtul Acount मध्ये कोणत्याही बॅंकेद्वारे त्याच दिवशी online पद्धतीने जमा करण्यात यावे. रक्कम जमा केल्यानंतर त्या चलनामधील सर्व विद्यार्थ्यांच्या Application Status मध्ये Send to board व Payment Status मध्ये Paid असा बदल झाला आहे का याची खातरजमा करावी. असे Status प्राप्त झालेली आवेदनपत्रेच ग्राहय धरण्यात येतील. विभागीय मंडळाने अशी आवेदनपत्रे व चलने स्विकारून व त्याचे Status ची खात्री करून पुढील कार्यवाही करावी. कनिष्ठ महाविद्यालयाने चलन उशीरा भरल्याचे निदर्शनास आल्यास संबधित विलंबाची यथायोग्य फी संबधित कनिष्ठ महाविद्यालयाकडून घेण्यात यावी.

Scanned with OKEN Scanner

२.त्याचप्रमाणे आवेदनपत्रामध्ये नाव/जन्मतारीख/विषय/माध्यम याबाबत Prilist च्या दुरूस्त्या राहिलेल्या असल्यास प्रचलित पद्धतीने (Offline) विहित शुल्कासह जमा करून घेणेबाबत उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांना सूचित करण्यात यावे.

३.प्रचलित पद्धतीप्रमाणे विशेष अतिविलंबासह आवेदनपत्रे स्विकारण्याच्या तारखा व सर्व सूचनांचे परिपत्रक संबधित उच्च माध्यमिक शाळा / कनिष्ठ महाविद्यालय प्रमुखांना पाठविण्यात यावे. तसेच पत्रात नमूद केल्याप्रमाणे अतिविलंब/विशेष अतिविलंब/अतिविशेष अतिविलंब शुल्कानुसार आवेदनपत्रे स्विकारावीत.

४.मात्र अशा विद्यार्थ्यांना विभागीय मंडळ निश्चित करेल त्याच परीक्षा केंद्रावर परीक्षा द्यावी लागेल. तसेच त्यांचा निकाल इतर विद्यार्थ्यांबरोबर जाहीर होवू शकला नाही म्हणे विद्यार्थी त्यास हरकत घेऊ शकणार नाही, असे विद्यार्थ्यांकडून हमीपत्र घेण्यात यावे. ही बाब उच्च माध्यमिक शाळांमार्फत विद्यार्थ्यांना सूचित करावी व त्याबाबतची अंमलबजावणी प्राधान्याने करण्यात यावी. कोणताही विद्यार्थी परीक्षेपासून वंचित राहणार नाही याची दक्षता घ्यावी.

(देविदास कुलाळ)
सचिव
राज्यमंडळ, पुणे ४.

क्र.मुंविमं/उमाप/ २९४३
वाशी नवी मुंबई-४०० ७०३.
दिनांक-23/09/२०२५

प्रति,
मुख्याध्यापक / प्राचार्य,
मुंबई विभागीय कार्यक्षेत्रातील
सर्व मान्यताप्राप्त उच्च माध्य. शाळा व कनिष्ट महाविद्यालये,
मुंबई / बृहन्मुंबई / ठाणे / पालघर / रायगड जिल्हे.

उपरोक्त पत्रानुसार मुख्याध्यापक / प्राचार्यांनी आपल्या स्तरावर नोंद घेऊन उचित कार्यवाही करावी.

(ज्योत्स्ना शिंदे-पवार)
प्र. विभागीय सचिव,
मुंबई विभागीय मंडळ,
वाशी, नवी मुंबई- ४०० ७०३

प्रत योग्य त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित :-
१ मा. शिक्षण उपसंचालक, मुंबई.
२ शिक्षणाधिकारी (माध्य.) ठाणे / पालघर / रायगड .
३ शिक्षण निरीक्षक, बृहन्मुंबई विभाग (पश्चिम/दक्षिण/उत्तर).
४ प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय जव्हार/डहाणू/शहापूर/पेण/पालघर.
प्रत माहितीस्तव :- मा.सचिव, राज्यमंडळ,पुणे

Scanned with OKEN Scanner